# नाशिक महानगरपालिका, नाशिक

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, पोस्ट बॉक्स नं. १२, नाशिक ४२२ ००२.

Visit us at : WWW.nashikcorporation.in E- mail: nashikcorporation@nashikcorporation.in

पी.बी.एक्स. : २५७५६३१, २५७५६३२, २५७७९२१, २५७७९२३
२५७१४७९, २५७१८७२ Fax : (०२५३) : २५७७९३६.


गोदावरी संवर्धन कक्ष विभाग
जा.क्र.मनपा/ गो.सं.क /कार्या-२/ /२०२३
दिनांक :- /०१/२०२३

प्रति,
मा. विभागीय आयुक्त सो.
नाशिक

**विषय:-** मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल जनहित याचिका क्र. १७६/२०१२ मधील दि. १८/१२/२०१८ रोजी मा.उच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देश..

**संदर्भ:-** मा. विभागीय आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली दि.१४/१०/२०२२ रोजीची जनहित याचिका क्र. १७६/२०१२ बैठकीतील सुचना.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन गोदावरी नदी प्रदूषण बाबत जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १८ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन मा.विभागीय आयुक्त,नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गोदावरी नदी प्रदूषण नियंत्रणाबाबत समितीची त्रैमासिक आढावा बैठक दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ रोजी घेण्यात आलेली आहे.

सदर आढावा बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने अहवाल तयार केलेला असून सोबत जोडत आहे.

आयुक्त
नाशिक महानगरपालिका नाशिक

आवक लिपीक
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक
नाशिकरोड, पिन-४२२१०१
04/01/2023 11.35

गोदावरी प्रदूषण जनहित याचिका क्र.१७६/२०१२ बाबत मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली दि.१४/१०/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीतील मुद्द्यांबाबत कार्यवाही अहवाल .

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| १. | 1)दि.30/09/2022 रोजी महापालिकेच्या उपसमितीची बैठक झाली असुन त्यामध्ये श्री.पंडीत यांनी STP अपग्रेडेशन व गोदावरीत जाणाऱ्या Strom Water बाबत करीत असलेल्या उपाययोजना संबंधीत मुद्दा उपस्थित केला होता. त्याअनुषंगाने श्री.चव्हाणके यांनी STP अपग्रेडेशन बाबतचा DPR हा केंद्र शासनास सादर केला असल्याची माहिती दिली होती. तसेच पावसाळ्यापुर्वी तीन महिने सार्वजनिक बांधकाम व मलनिःस्सारण विभागातर्फे पावसाळी गटारमार्फत सांडपाणी नाल्यात मिसळणारी ठिकाणे शोधुन बंद करण्यात येत असल्याचे सांगितले.<br>केंद्र शासनाचे संबंधीत विभागाने DPR प्रस्ताव तपासला असुन त्यामध्ये काही त्रुटी काढल्या आहेत. त्रुटींची पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव 11 तारखेपर्यंत सादर करण्यास त्यांनी सांगितले होते. तथापी DPR मध्ये काढलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यास वेळ लागणार असल्याने 15 दिवसांची वेळ मागुन घेतली असल्याचे मनपा आयुक्त यांनी खुलासा केला.<br>STP अपग्रेडेशन बाबत सुधारीत DPR प्रस्ताव केंद्र शासनास पाठवतांना तो अगोदर निरी संस्थेकडून तपासुन घ्यावा. सर्व त्रुटींची पुर्तता झाल्याची खात्री करुनच प्रस्ताव केंद्र शासनास सादर करावा. तसेच STP संबंधातील निरीचा यापुर्वीचा अहवाल देखील प्रस्तावासोबत जोडून पाठवावा. सदरची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करावी. | भू.ग.यो विभाग मनपा | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे नवीन मापदंडानुसार मलशुध्दीकरण केंद्र अद्ययावत करणेसाठी तपोवन, आगरटाकळी, चेहेडी व पंचक या 4 मलशुध्दीकरण केंद्रांबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल किंमत र.रु.400.14 कोटी पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे 5 आक्टोबर 2021 रोजी सादर करण्यात आला होता.<br>राज्य नदी संवर्धन योजने अंतर्गत सचिव स्तरावरील प्रदत्त समितीने दि. 13/06/2022रोजी मान्यता देऊन सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्रशासनास दि. 13/07/2022 रोजीचे पत्रान्वये मंजुरीस्तव सादर केला आहे.<br>त्यावर NRCD, नवी दिल्ली मार्फत प्राथमिक छाननी करून सुधारित अहवाल सादर करणे बाबत दिनांक 22/09/2022 चे पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार र.रु. 520.31 कोटीचा सुधारित अहवाल तयार करून दि. 11/11/2022 अन्वये केंद्र शासनास पुढील मंजुरीस्तव सादर केला आहे.<br>सदर STP चे DPR, NEERI संस्थेकडुन vetting करुन मिळावेत या करिता NEERI संस्थेस दि.08.12.2022 च्या पत्रान्वये e-mail करुन विचारणा केली आहे. तथापी राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या प्रदत्त् समीतीने मान्यता देतांना DPR Vetting बाबत नमुद केले आहे. IIT अथवा तत्स्म त्रयस्थ नामांकित संस्थेमार्फत प्रमाणित करुन घेणे आवश्यक असल्याबाबत निर्णय दिला आहे. त्यानुसार IIT Mumbai /Roorki यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांचा होकार कळवून फी कळविली आहे. तरी NEERI किंवा IIT या पैकी कोणत्या संस्थेकडुन तपासुन घेणे योग्य राहील याचा निर्णय घेणे आवश्यक आहे. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| | 2) 50 ठिकाणी नदीपत्रात पाणी जात असल्याबाबत श्री. पगारे यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत Strom Water व्दारे नाल्यात मिसळणाऱ्या सांडपाण्याची प्रत्यक्षात तपासणीत 60 ठिकाणे आढळून आलेली आहेत. त्यापैकी 35 ठिकाणांची कामे पावसाळ्यापुर्वी पुर्ण केली असुन बाकीची 25 ठिकाणे आता पावसाळ्यानंतर करणार आहोत. काही ठिकाणी Sewage line नसल्याने लोकांनी Strom water ला ड्रेनेज जोडले आहे. ती ठिकाणे शोधली असुन तेथे पावसाळ्यानंतर Sewage line टाकत असल्याची माहिती दिली श्री.मुंडे यांनी दिली.<br>उर्वरित ठिकाणांची कामे तातडीने पुर्ण करावी. नदी पत्रात विना प्रक्रिया केलेले सांडपाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच सांडपाण्याचे ऑडीट करणे गरजेचे आहे. नदीपात्रातुन उचल होणारे पाणी, प्रक्रिया केलेले पाणी व प्रक्रिया करून पुन्हा नदीत सोडण्यात येणारे पाणी यांचा हिशोब दिला पाहिजे. सर्व नद्यांचे पाण्याचा ऑडीट संबंधीची माहिती पुढील बैठकीपुर्वी देण्यात यावी. | भू.ग.यो विभाग मनपा | मनपा हददीतील 67 नाल्यांची एप्रिल 2022 मध्ये पाहणी केली होती त्यात पावसाळी पाण्याचे पाईप लाईन नाला व नदीला येऊन मिळणारे ठिकाणांची पाहणी केली. त्यापैकी 43 ठिकाणी पावसाळी गटारी मधुन सांडपाणी प्रवाहीत होत असल्याचे आढळुन आले. मनपाच्या मलनिःसारण व सार्व. बांधकाम विभागामार्फत एकत्रितरित्या या 43 ठिकाणांबाबत कार्यवाही सुरु करुन 43 ठिकाणां पैकी 25 ठिकाणी सांडपाणी पावसाळी गटारीत जोणेचे बंद करण्यासाठी पावसाळया पुर्वी काम पूर्ण झालेले आहे. पावसाळया नंतर 07 ठिकाणी कामे करुन सांडपाणी पावसाळी गटारीत जानेपासून बंद करण्यात आले आहे. उर्वरीत ठिकाणी काम करणेत येत आहे. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| | 3) प्लास्टीक व रासायनीक कचरा नदीपात्रात मिसळू नये यासाठी विद्यार्थी व नागरीकांमध्ये जनजागृतीच्या संदर्भात चर्चा झाली होती. प्लास्टीक कचराबाबत महापालिकेच्या घनकचरा विभागामार्फत कारवाई चालू आहे. सिंगल युज प्लास्टीक वापरु नये याबाबत वर्तमानपत्रातुन वेळोवेळी जाहीर आवाहन करण्यात येते. त्याअनुषंगाने बातम्या दिल्या जातात. सिंगल युज प्लास्टीक बाबत नियमित दंडात्मक कारवाई देखील करण्यात येते. याबाबत अहवाल एमपीसीबी कडे नियमित पाठविला जातो. नाशिकमध्ये प्लास्टीक बंदी बाबत इतर शहरांच्या मानाने चांगल्या प्रकारे कारवाई चालू असल्याचे एमपीसीबीचे अधिकारी यांनी बैठकीचे दिवशी सांगितले असल्याचे श्री.मुंडे यांनी नमुद केले. महापालिकेकडून जनजागृती, प्रबोधन नियमित करण्यात येत असुन दोषी आढळणाऱ्या नागरीक व आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असलेबाबत मनपा आयुक्त यांनी खुलासा केला.<br>श्री.पगारे यांनी दंडाबरोबर नागरीकांमध्ये जगजागृती सुध्दा होणे गरजेचे असुन शहरातील विभागीय पातळीवरील समित्या कार्यन्वीत करुन जास्तीत जास्त लोकांना प्लास्टिक पिशवी ऐवजी कापडी पिशवी वापरावी यापध्दतीने जनजागृती केली पाहिजे अशी सुचना केली.<br>श्री.पंडीत यांनी प्लास्टिक वापराबाबत छोट्या व्यापाऱ्यांवर कारवाई होत असते त्याऐवजी उत्पादक/घाऊक व्यापारी आहेत त्यांचेवर मोठ्या प्रमाणात कारवाई झाली पाहिजे अशी सुचना केली. | घनकचरा व्यवस्थापन विभाग मनपा | घनकचरा व्यवस्थापन विभाग नाशिक महानगरपालिका नाशिक यांच्या वतीने नदी प्रदुषण रोखण्यासाठी सिंगलयुज प्लास्टिक वापरणाऱ्या तसेच नदी पात्रात प्लास्टिक वेस्ट व इतर अनुषंगीक कचरा नदी पात्रात टाकणाऱ्या नागरीकांना व विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई नियमितपणे करण्यात येते तसेच नागरीकांमध्ये जनजागृती होणेकरीता विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. त्याबाबतची सविस्तर माहिती (पीपीटी) स्वरुपात सादर करण्यात येत आहे.<br>घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत नदीपात्रात कपडे धुणे, वाहने धुणे, निर्माल्य टाकून अस्वच्छता करणे, इत्यादी बाबत... दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.<br>दिनांक 01 एप्रिल 2022 ते 30 नोव्हेंबर 2022 या कालावधीमध्ये एकूण 37 व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करुन रक्कम रुपये 1,13,400/- दंड करण्यात आला. |
| | ५.नदी पत्रातील पाणवेली काढण्यासाठी ट्रॅश स्किमर बाबतचा विषय झाला होता. ट्रॅश स्कीमर आता स्मार्ट सिटीचे ताब्यात आहे. ते महानगर पालिकेला हस्तांतरीत करुन पाणवेली काढण्यासाठी ट्रॅश स्कीमरचा वापर करण्यात येणार असल्याचे श्री.मुंडे यांनी सांगितले.<br>ट्रॅश स्कीमर किती तास चालते, किती इंधन खर्च झाले, नदी पत्रातुन किती प्रमाणात पाणवेली बाहेर काढल्या तसेच काढलेल्या पाणवेलींचे कंम्पोस्ट केले का अशी आकडेवारी देता आली पाहिजे. तशी कार्यपध्दती विकसीत करुन यापुढे प्रत्येक मिटींगला ती आकडेवारी देण्यात यावी. | घनकचरा व्यवस्थापन विभाग मनपा/यांत्रिकी विभाग, मनपा, नाशिक | ट्रॅश स्किमर मशीन बाबत मा.आयुक्त सो. मनपा यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र/मनपा/का.व्य.वि./अअ/२६५/२०२२ दि.०९/१२/२०२२ अन्वय हस्तांतरित करण्यात आले आहे. |

| मुद्दा क्र. | मनपाशी संबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| | ६.शहरातील भूजल पातळी वाढविणेबाबत चर्चा झाली होती. याबाबत क्रेडाई नाशिक आयुक्त महानगरपालिका आणि बिल्डर्स असोसिएशन यांची मदत घेता येईल. भूजल पातळी वाढली तर निश्चितपणे गोदावरीचा नैसर्गिक प्रवाह वाढणार आहे. शहरात ज्या काही खुल्या जागा आहे त्या ठिकाणी रेनवॉटर हार्वेस्टिंग जास्तीत जास्त झाली तर त्याठिकाणाची भूजल पातळी वाढेल असे श्री.मुंडे यांनी नमुद केले.<br>कॉंक्रीटीकरण, पेवर ब्लॉक व भुयारी गटार योजनेमुळे शहरात पाणी मुरण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे ज्या खुल्या जागा आहेत तेथे रेनवॉटर हार्वेस्टिंग करण्यासोबतच महानगरपालिकेने आत्तापर्यंत ज्यांना बांधकाम कम्पलिशन परवानगी दिलेल्या आहेत अशा मोठ्या सोसायटी, मोठ्या कॉलनी यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग बसविणेबाबत कार्यवाही केली आहे किंवा नाही. तसेच त्यांचे रेन वॉटर हार्वेस्टिंग कार्यरत आहे किंवा नाही याबाबत मोहीम घेऊन तपासणी करावी. तसेच ज्या-ज्या ठिकाणी STP अनिवार्य केले आहे ते ही कार्यरत आहे किंवा नाही याची देखील तपासणी करावी. STP व रेन वॉटर हार्वेस्टिंग कार्यरत नसेल तर त्याबाबत युनिफाईड डीसीपीआर व हेमाटिपी अॅक्ट मध्ये दंडाची देखील तरतुद असल्याने नियमानुसार तशी कार्यवाही करावी. पुढील बैठकीच्या वेळेस कारवाईची आकडेवारी देण्यात यावी. | नगर नियोजन विभाग. / | नाशिक महानगरपालिकेचा विकास योजना आराखडा व विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली सन 2017 साली मंजुर झाली आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील कलम 33 नुसार पर्जन्य जलसंधारण योजना (रेन वॉटर हार्वेस्टिंग) करणे बंधनकारक होते. त्यानुसार नाशिक महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या विकसन परवानगी पत्रामध्ये पर्जन्य जलसंधारण योजना (रेन वॉटर हार्वेस्टिंग) करणेबाबत अट नमूद करण्यात आलेली आहे. तसेच सदर बांधकामांना वापराचा दाखला देतेवेळी पर्जन्य जलसंधारण योजना (रेन वॉटर हार्वेस्टिंग) केलेबाबत खात्री देखील करण्यात येते. तसेच मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली ही 2020 साली प्रसिध्द झाली असून सदर नियमावलीमध्ये देखील कलम 13.3 नुसार पर्जन्य जलसंधारण योजना (रेन वॉटर हार्वेस्टिंग) करणे बंधनकारक आहे. त्यानुसार देखील नाशिक महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या विकसन परवानगी पत्रामध्ये पर्जन्य जलसंधारण योजना (रेन वॉटर हार्वेस्टिंग) करणेबाबत अट नमूद करण्यात आलेली आहे. तसेच सदर बांधकामांना वापराचा दाखला देतेवेळी पर्जन्य जलसंधारण योजना (रेन वॉटर हार्वेस्टिंग) केलेबाबत खात्री देखील करण्यात येते.<br>तथापि ज्या ठिकाणी भोगवटा दाखला देण्यात आलेला आहे. परंतु पर्जन्य जलसंधारण (रेन वॉटर हार्वेस्टिंग) व्यवस्था सुस्थितीत ठेवलेली नाही अशा इमारतींचे महानगरपालिकेच्या अभियंतांकडून व्यापक सर्वेक्षण करण्यात येवून पर्जन्य जलसंधारण ( रेन वॉटर हार्वेस्टिंग) सुस्थितीत नसलेल्या इमारतींवर दंडात्मक कारवाई करणेत आली आहे. तसेच इमारती धारकांना आवाहन करण्यात आले होते की, त्यांनी त्यांचे इमारतीची पर्जन्य जलसंधारण (रेन वॉटर हार्वेस्टिंग) व्यवस्था सुस्थितीत आहे किंवा नाही याची खात्री करुन सुस्थितीत नसल्यास पर्जन्य जलसंधारण (रेन वॉटर हार्वेस्टिंग) व्यवस्था सुस्थितीत करुन घ्यावी अन्यथा त्यांना दंडात्मक कारवाईस |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| | | | सामोरे जावे लागेल.<br>त्यानुसार नाशिक महानगरपालिकेच्या अभियंतांना पण व्यापक सर्व्हेक्षणाची मोहिम हाती घेण्यात येऊन 520 इमारतींचे सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यापैकी 396 इमारतीमध्ये पर्जन्य जलसंधारण कार्यान्वित असल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत 118 इमारतींवर दंडात्मक कार्यवाही करुन सुमारे र.रु. 118000/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे. त्यापैकी बहुतांश इमारतींनी पर्जन्य जलसंधारण पुनश्चः कार्यान्वित केले आहे. त्याबाबत अभियंत्यांमार्फत खात्री करण्यात आली आहे. सदर सव्र्व्हेक्षण सन 2019-20 दरम्यान करण्यात आले असून तद्नंतर कोव्हीड मुळे थांबविण्यात आले होते. सद्यस्थितीत सदर सर्व्हेक्षणाचे काम पुनश्चः कार्यान्वित करण्यात आले आहे.<br>तसेच नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींवर देखील पर्जन्य जलसंधारण योजनेच्या व्यवस्था करण्याचे काम महानगरपालिकेच्या बांधकाम करण्यात आले आहे.. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| | ७. मनपा शिक्षण विभागाने गोदावरी संवर्धना संदर्भात शाळांमध्ये जनजागृतीचे अनुषंगाने मोहिम राबविली असुन गोदावरीचे गीत तयार केले आहे. मनपाच्या शिक्षीकेने ते लिहीले असुन श्री. संजय गिते यांनी संगीतबद्ध केले आहे. मनपाच्या सर्व शाळांमध्ये प्रार्थनेच्यावेळी सदर गीत गायले जात असल्याचे मनपा आयुक्त यांनी सांगितले. सदरवेळी गीताचे ऑनलाईन सादरीकरण करण्यात आले.<br><br>सदर गीताची माहिती कार्यालयामार्फत प्रसिध्दी करण्यात यावी. | शिक्षण विभाग मनपा | मनपा शिक्षण विभागाच्या आवाहनानुसार नाशिकचे भुषणावह नामांकीत गायक श्री. संजय गिते यांनी संगीतबध्द केलेले व गायलेल्या गोदागीताचे मा. आयुक्त सो मनपा नाशिक यांच्या हस्ते दि. 15 ऑगस्ट 2022 रोजी औपचारिक अनावरण करण्यात आलेले गोदागीत शाळास्तरावर दैनंदिन परिपाठाचे दरम्यान विद्यार्थ्यांव्दारे सामूहिक गायनासाठी सर्व शाळांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. |
| | ८. गोदावरी संवर्धनाबाबत वेबसाईट तयार करुन तक्रारीसाठी पोर्टल तयार करणे व या संदर्भात महापालिकेकडून जी कामे करण्यात येत आहे ती वेबसाईटवर प्रसिध्द करणे या मुद्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>त्याअनुषंगाने गोदावरी संवर्धनाबाबत वेबसाईट तयार करुन प्रसिध्द केली आहे. तसेच तक्रारीसाठी पोर्टल देखील तयार केले असुन महापालिकेकडून करण्यात आलेल्या कामांची देखील प्रसिध्दी वेबसाईटवर नियमित अपलोड करण्यात येत असल्याचे श्री.मुंडे यांनी सांगितले.<br>तक्रार आल्यानंतर तीच्यावर कार्यवाही केली जाते सदरच्या कार्यवाहीची देखील प्रसिध्दी देण्याबाबत श्री.पंडीत यांनी सुचना केली.<br>गोदा संवर्धनाबाबत महापालिकेकडून करण्यात येणाऱ्या कामाबाबत वेबसाईटवर नियमीतरित्या प्रसिध्दी देण्यात यावी. तक्रारींच्या कार्यवाहीबाबत देखील प्रसिध्दी देण्यात यावी. जेणेकरुन समाधानकारक निर्गत केलेल्या तक्रारींवरुन केलेल्या कामाची गुणवत्ता व सकारात्मकता दिसुन येईल. | गोदावरी संवर्धन कक्ष विभाग मनपा | गोदावरी संवर्धनाबाबत वेबसाईट तयार करुन मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच तक्रारीसाठी पोर्टल देखील तयार केले असुन महापालिकेकडून करण्यात आलेल्या कामांची महिती वेबसाईटवर नियमित अपलोड करण्यात येते व वेळोवेळी महिती अद्यावत करण्यात येते. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| | 9. लेंडी नाला बाबत एक वर्षापुर्वी दि. 18/10/2021 रोजी पत्र दिले असुन आजही लेंडी नाला मधुन सांडपाणी सुरु असलेबाबत श्री. पगारे यांनी नमुद केले. एक वर्ष झाले होऊनही नाला बंद होत नाही. त्यामुळे संबंधीत महापालिकेचे अधिकारी, स्मार्ट सिटीचे अधिकारी व त्यांचेवर कारवाई न करणारे एमपीसीबीचे अधिकारी यांचेवर कारवाई झाली पाहिजे, त्यांना दंड झाला पाहिजे असा मुद्दा श्री. पगारे यांनी उपस्थित केला.<br>**याबाबत स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मोरे यांनी खुलासा केला की** स्मार्ट सिटीने लेंडी नाल्या पासुनचे सगळे सांडपाणी बंद करुन घेतले आहे. पुढील बाजुचे सर्व काम झाले आहे. पाठीमागील बाजुस नाल्यावर लोकांनी अतिक्रमण केलेले असल्याने तेथील काम बाकी असल्याचे सांगितले. पाठीमागे बंद केलेले नसल्याने पाणी येत आहे. लोखंडी पुलापासुन पुढचे सर्व काम केलेले असल्याचा खुलासा केला. पावसाळ्यात चार महीने अतिक्रमण काढता येत नाही. आता पावसाळा संपला आहे मोहिम सगळीकडे सुरु आहे. स्मार्ट सिटी व महापालिकेने समन्वय ठेऊन मोहीम घेऊन अतिक्रमण काढून घ्यावे असे मनपा आयुक्त यांनी सांगितले.<br>मागील बाजुचेही काम पुर्ण करावे. सदर नाल्याचे कामाची महापालिका व स्मार्टसिटी दोघांचीही जबाबदारी आहे. महापालिकेने नाल्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही तातडीने करावी. लेंडीनाल्याचे स्मार्टसिटीने केलेले कामाची महापालिका आयुक्त यांनी भेट देऊन पाहाणी करावी. स्मार्ट सिटी व महापालिकेने समन्वय ठेऊन लेंडी नाल्याचे काम पुर्ण करावे.<br>महापालिका उपसमितीने सर्व सदस्यांसमवेत लेंडी नाल्याची संयुक्त पाहणी करुन महापालिका आयुक्तांनी पुढील कार्यवाही करावी. | भू.ग.यो विभाग मनपा<br><br>अतिक्रमण विभाग मनपा | लेंडी नाला येथेदि. 16.12.2022 रोजी मा. आयुक्त मनपा, निरी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मनपाचे अधिकारी तसेच याचिककर्ते यांच्या समवेत सदर ठिकाणी पाहणी झाली. नाला अडविणे व वळविणेचे काम स्मार्ट सिटी व मार्फत सुरु असुन नाल्याव्दारे नदी पात्रात मिसळणारे सांडपाणी अडवुन मलवाहिकेत वळविणेत आले आहे.<br>मा. विभागीय आयुक्त सो. नाशिक यांचे कार्यालयात दि. 14/10/2022 रोजी झालेल्या आढावा बैठकीत घेतलेल्या विषयामधील चर्चेत मा. उपआयुक्त अतिक्रमण यांचेशी निगडीत असलेला मुद्दा क्र. 1 (9) मधील पंचवटी, लेंडीनाला येथील पाठीमागील बाजुस नाल्यावर लोकांनी अतिक्रमण केले असल्याने तेथील सांडपाणी बंद करण्याचे नमुद करण्यात आले आहे. सदर लेंडीनाल्यातील अतिक्रमणा बाबत मा. अति. आयुक्त (सेवा) सो., उपआयुक्त (अति), नगरनियोजन विभागाचे अधिकारी व पंचवटी विभागीय अधिकारी यांनी संयुक्तीक पहाणी केली आहे.<br>त्यानंतर मा. अति.आयुक्त (सेवा) सो. यांचेकडेस स्मार्ट सिटी विभाग, अतिक्रमण विभाग व नगरनियोजन विभाग यांची बैठक घेण्यात आली होती. तथापी सदर बैठकीत नेमके कोणते अतिक्रमण काढावयाची याबाबत स्मार्ट सिटी ने कोणतीही यादी न दिल्याने त्यांना तात्काळ यादी सादर करण्याचे मा. अति. आयुक्त (सेवा) सो. यांनी आदेशीत करण्यात आले आहे. व यादीनुसार नगरनियोजन विभाग यांना सदर ठिकाणी तात्काळ डिमार्केशन करणे कामी आदेशीत करणेत आलेले आहे.<br>सबब स्मार्ट सिटीने निष्कासीत करावयाच्या अतिक्रमणाची यादी देण्यात आल्यानंतर नगरनियोजन विभागामार्फत रेखांकन करण्यात आल्यानंतर तात्काळ अतिक्रमण विभागा मार्फत सदरची अतिक्रमणे निष्कासीत करणेत येतील. दरम्यान दि.27/12/2022 रोजी स्मार्ट सिटीच्या कामात व्यत्यय येणारे गोदापात्रातील मंदिरा लगतची दोन घरे निष्कासीत करणेत आले आहेत. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
| --- | --- | --- | --- |
| | | स्मार्ट सिटी विभाग/ | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी (मलनिः) विभाग व स्मार्ट सिटी प्रकल्पाचे अधिकारी यांचे दि.22/11/2022 रोजीच्या संयुक्त पाहणीत ठरल्यानुसार रामवाडी नाला लोखंडी पुलाजवळ स्मार्ट सिटी मार्फत ९०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन नाला क्रॉसिंग करुन पुढे नाल्याच्या उजव्या बाजुने आर.सी.सी. पुल क्रॉस करणे व नाल्यातील 450 मीटर व्यासाची जुनी पाईप लाईन नव्याने टाकण्यात येणाऱ्या पाईप लाईनला जोडणे तसेच पुलाच्या अपस्ट्रीम उजव्या बाजुला नाल्यातुन वाहणारे सांडपाणी अडविणे व वळविण्या करीता चेंबर बांधुन व्यवस्था करण्याचे ठरले. त्यानुसार काम पुर्ण करण्यात आले असुन, लेंडी नाल्यामधील सांडपाणी पुर्णपणे पाईप लाईन व्दारे वळविण्यांत आले असुन, सद्यस्थितीत फक्त चेंबरचे काम प्रगतीपथावर असून, 7-8 दिवसात सदर काम पुर्ण होईल. त्यामुळे सद्यस्थितीत लेंडी नाल्यातून कोणतेही सांड पाणी गोदावरी नदी पात्रात प्रवाहीत होत नाही.<br>दिनांक 16/12/2022 रोजी महापालिका उपसमितीने नेरी अधिकाऱ्यांच्या समवेत सदर स्थळाची पाहणी केली आहे. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| ३. | **महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ स्तरावरील उपसमिती संबंधीत मुद्दे-**<br>१) एमपीसीबी व महापालिका ह्या दोघांचे संबंधातील मुद्याबाबत विचारणा करण्यात आली. याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. बोरसे यांनी नमुद केले की, नागपुर निरीची टिम माहे सप्टेंबर मध्ये पाहणी करुन गेली असुन त्यांनी CETP ची जागा, आगरटाकळी येथील STP ची पाहाणी केली. तसेच एमपीसीबी, निरी व महापालिका यांची एक संयुक्त बैठक देखील घेतली आहे. त्यांनी काही सॅम्पल देखील गोळा केले असुन ते अहवाल देणार आहेत. CETP मधुन प्रक्रिया केलेले effluent निघेल ते महानगर पालिकेच्या STP ला किंवा ड्रेनेज लाईनला किंवा त्यांचे मॅनहोलला जोडता येईल का व ते तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य आहे किंवा नाही याबाबत निरीकडे अभिप्राय मागविले आहे. दिवाळीच्या आत अहवाल देण्यासाठी त्यांना विनंती केली आहे. त्यांचा अहवाल आल्यावर पुढची कार्यवाही करता येईल. सदर मुद्दा निकाली निघाल्यावर पुढची कार्यवाही एमआयडीसी करणार असल्याचे सांगितले.<br>निरीशी संपर्क करुन अहवाल प्राप्त करुन घ्यावा. CETP बाबत एमआयडीसी, एमपीसीबी व महानगरपालिकाने समन्वयाने पुढील कार्यवाही करावी. | भू.ग.यो विभाग मनपा | मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सातपुर व अंबड MIDC क्षेत्रातील रासायनिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी CETP उभारणेची प्रक्रिया MIDC व MPCB मार्फत कार्यवाही सुरु आहे. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| ६. | **शिक्षण विभाग संबंधीत**<br>१)गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रण व जनजागुतीचे अनुषंगाने शहर व ग्रामीण भागातील शाळांमध्ये विविध उपक्रम, गोषवाक्य, रांगोळी स्पर्धा इ. राबविणेबाबतचा अहवाल शिक्षण उपसंचालक यांनी सादर केलेला असल्याचा खुलासा उपस्थिती प्रतिनिधी श्रीमती पाटील, सहा संचालक यांनी केला.<br>उल्लेखनिय व चांगले काम करणारे यांचा सत्कार, गौरव करण्याबाबत श्री. पंडीत यांनी मुद्दा मांडला.<br>ज्या-ज्या उपसमितीला गोदावरी नदी प्रदुषणासंदर्भात कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनिय, चांगले काम करणाऱ्यांचा प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार, प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावयाची असेल त्या उपसमिती यांनी आढावा बैठक सुरु होण्यापुर्वी पाच मिनटे अगोदर संबंधीतांचा सत्कार, प्रमाणपत्र देणे इत्यादीचा कार्यक्रम आयोजित करता येईल अशा सुचना देण्यात आल्या.<br>२)मनपा शिक्षण विभागासंबंधीत मागील बैठकीत दिलेल्या निर्देशांबाबत श्री मुंडे यांनी नमुद केले की, निरिचे अहवाल व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांचे मराठी भाषांतर करण्याचे काम महानगरपालिकेच्या शाळांकडे दिले आहे. परंतु त्यांच्याकडे प्राथमिक शाळा असुन तेवढा टेक्नीकल स्टाफ नसल्या कारणाने त्यांचेकडून भाषांतराचे काम करणे शक्य नसल्याचे श्री. मुंडे यांनी नमुद केले.<br>मागील बैठकीत सदर कामाची जबाबदारी ही शिक्षण विभागास दिली असल्याने मनपा शिक्षण विभागाने शिक्षण उपसंचालक कार्यालयाशी समन्वय साधुन भाषांतराचे काम करुन घ्यावे. शिक्षण उपसंचालक यांचेशी चर्चा करुन पुढील कार्यवाही करावी. आवश्यकता पडल्यास माहिती उपसंचालक श्री. इगवे यांची मदत घ्यावी. | शिक्षण विभाग मनपा | 1. मनपा क्षेत्रातील बहुतांशी पालक व विद्यार्थी हे गोदाकाठी वसलेल्या वस्त्या, वार्ड मधील रहिवासी आहेत. अशा नागरिक व पालकांचे उदबोधन करून गोदा प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी ते या मोहिमेतील महत्वाचा भाग असल्याची जाणीव करून देण्यासाठी विविध प्रसार माध्यमाचा वापर केला जात आहे..<br>2. शिक्षक, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक यांच्या वेळोवेळी होणाऱ्या आढावा बैठकांमध्ये गोदावरी नदी संरक्षण, स्वच्छतेचे महत्त्व या विषयांवर शिक्षकांमार्फत विशेष चर्चा सत्रांचे आयोजन केले जाते. देशाचे भावी नागरिक हे सुजाण नागरिक होणेसाठी समुपदेशन करण्याचे दृष्टीने विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाते.<br>3. सर्व शाळांमधून नियमीत होणाऱ्या माता पालक सभांमधून गोदावरी मातेचा आदर करणे, गोदावरी नदी प्रदूषण व त्याचे दुष्परिणाम आणि गोदावरी स्वच्छता निदानाचे महत्व यातील विश्लेषणात्मक माहीतीव्दारे मनातील नकारात्मक दृष्टीकोन बदलण्याच्या दृष्टीने समुपदेशन केले जाते.<br>4. गोदावरी प्रदूषण व निर्मुलना बाबत शाळांमधील दैनंदिन परिपाठातून विदयार्थ्यांकडून विविध घोषवाक्य वदविले जाते, शाळांना विदयार्थ्यांच्या प्रत्यक्ष गोदाकाठावर भेटी देवून त्याव्दारे जनजागृती केली करण्याचे निर्देश केले आहेत. त्याअनुषंगाने गोदाप्रदुषण व निर्मुलन जनजागृती बाबत राबविलेल्या उपक्रमांचे निवडक छायाचित्र व ppt (softcopy) माहितीस्तव सादर करण्यात येत आहे. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| १० | **रेडलाईन, ब्लयुलाईन मार्किंग बाबत मुद्दा-**<br>१)नदी पात्रालगत ब्लयु लाईन मार्कीग करणे बाबत श्री पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला. याबाबत मनपा आयुक्त यांनी नमुद केले की, ब्लयु लाईनच्या बाबतीत माहे डिसेंबर 21 आयुक्त महानगरपालिका मध्ये UDCPR आले असुन त्यामध्ये ब्लयु लाईन, रेडलाईन बाबतचे निर्देश शासनाने दिलेले आहेत त्याप्रमाणे कामे केली पाहिजे असा खुलासा केला. मार्किंगचे काम पुर्वी जलसंपदा विभागाने केलेले आहे. मार्किंग करण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची असल्याचे नमुद केले.<br>त्याअनुषंगाने जलसंपदा विभागाच्या अधिक्षक अभियंता श्रीमती अहिरराव यांनी नमुद केले की, या संबंधातील सर्व माहिती सन 2008 मध्येच महानगर पालिकेकडे दिली आहे. पुर्वी सदरचे काम झालेले आहे. मार्किंग करण्याचा विषय सद्यस्थिती आमचेकडे नाही. तसेच मार्किंगसाठी निधी लागणार असल्याचेही नमुद केले.<br>यापुर्वी पुराबाबत बैठक झाली होती. त्यामध्ये धरणातुन सोडण्यात येणाऱ्या पुर पाण्याच्या अनुषंगाने नदी काठच्या नागरीकांना जागेवरती कळण्यासाठी पुररेषा मार्किंग बाबत चर्चा झाली होती. पुररेषा मार्क करतांना जागेवरती रेडलाईन, ब्लयुलाईन मार्क केली तर त्यावरुन पुर रेषेत कुठे काम सुरु असेल तर नागरिकांना लगेच कळेल. त्यामुळे काम सुरु होतांनाच तक्रार आली तर त्यावर पटकन कारवाई करता येईल. तसेच किती क्युसेक पाणी सोडल्यावर कुठे पर्यंत पाण्याची पातळी राहील हे ही नागरीकांना कळेल. मार्किंग बाबत आता महानगर पालिका व जलसंपदा विभाग यांनी समन्वयाने कार्यवाही करावी. | नगर नियोजन विभाग | नाशिक महानगरपालिका हद्दीतील गोदावरी नदी, नंदीनी नदी, वाघाडी नदी व वालदेवी नदी यातील लाल पुररेषा व निळी पुररेषा यातील अतिक्रमणाबाबत सिमांकन करुन कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले होते. त्याअनुषंगाने महानगरपालिकेकडील जी. आय.एस. मॅपींग करणेकामी मे. अक्षय इंजिनियर्स ॲण्ड योगेश आरोटे (जे.व्ही.) यांची नियुक्ती केली असून त्यांना प्रथम गोदावरी नदी पुररेषेतील अतिक्रमणाबाबत सिमांकन करणेकामी आदेश दिलेले आहेत व याबाबत 15 दिवसात अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सोबत पत्राची छायांकित प्रत जोडली आहे. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सादर करण्यात येईल. त्याअनुषंगाने निळ्या व लाल पुररेषेतील अतिक्रमीत बांधकामे निष्कषित करणेचे काम मनपा अतिक्रमण विभागाकडून नियमानुसार करण्यात येईल. सदरचा अहवाल आपल्या माहितीस्तव सादर. |

| मुद्दा क्र. | मनपाशी सबंधित मुद्दा | कार्यवाहक विभाग /यंत्रणा/अधिकारी | खुलासा |
|---|---|---|---|
| ८. | **रिटेनिंग वॉल संदर्भात मुद्दा-**<br>1) यापुढे गोदावरी नदी किंवा तीचे उपनद्यांवर रिटेनिंग वॉल बांधायची असेल तर सिमेंटचा सा. बा. नदीपात्रात वापर न करता गॅबीयन वॉल बांधायची असलेबाबत श्री. पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>तसेच स्मार्ट सिटीने नदी पात्रात सिमेंटची भिंत बांधली असल्याने सदर मुद्दा कोर्टात असल्याचे श्री.पगारे यांनी नमुद केले.<br>रिटेनिंग वॉल बाबत निरीचे अभिप्राय घेतल्या शिवाय काम करायचे नाही. यापुढे महापालिकेकडून बांधकाम परवानगी देतांना तसेच जिथे नाला ट्रीटमेंट वैगरे दिली जाते अथवा नाला वरुन बंद केला जातो त्यासाठी महापालिकेने नियमावली तयार करावी. नाला वरील बाजुने बंद केला तर त्यावरुँन रस्ता जाऊ द्यायचा नाही.<br>२) लेंडी नाल्याच्या वरच्या बाजुस स्मार्टसिटीने बांधलेल्या भिंतीचे पुढे थोडी माती टाकून पात्र अरुंद करीत असले बाबत श्री. पगारे यांनी मुद्दा मांडला.<br>महानगर पालिकेच्या उपसमितीची ज्यावेळी व्हिजीट होईल तेव्हा उपसमिती सदस्य, एमपीसीबी व जलसंपदा विभागाने एकत्रित पाहणी करावी व महानगरपालिका आयुक्त यांनी सदर मुद्दा बाबत पुढील कार्यवाही करावी. | सा.बा. विभाग. मनपा | नाशिक महानगरपालि नाशिक महानगरपालिका हद्दीतील नद्यांच्या काठावर संरक्षक भिंत म्हणून बांधण्यात येणा-या भिंतीचे कामासाठी गॅबीयन पध्दतीने वॉल बांधणे बाबत बांधकामासाठी परवानगी देण्यात येते, आर.सी.सी. पध्दतीने बांधकामाची परवानगी देण्यात येत नाही. त्याच प्रमाणे विकास योजना रस्त्याच्या बाजूने नाला असल्यास रस्त्याची रुंदी व नाल्याची रुंदी दोन्ही कमी होऊ नयेत यादृष्टीने नवीन विकास आराखडा तयार करतांना अथवा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मध्ये आवश्यकसुधारणा वा निर्देश शासनाकडून प्राप्त होणे आवश्यक आहे. |
| १३ | रामकुंडातील पाण्यात फेस येत असलेबाबत दि.20/10/2022 रोजी वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली असलेबाबत श्री. पगारे यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>याबाबत महानगर पालिका आयुक्त यांनी पुढील कार्यवाही करावी. | गोदावरी संवर्धन कक्ष विभाग मनपा | मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६/१२/२०२२ रोजी दुपारी २.३० मि.वाजता पाहणी दौर झाला. यात उपाययोजना करणेसाठी जा.क्र. मनपा /गोसंक / कार्या-२/०१/२०२३ दिनांक ०२/०१/२०२३ अन्वये पत्र देऊन निरीकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. |
| १४ | **नदीच्या पुलांवर जाळ्या बसविणेबाबत उपस्थित मुद्दा –**<br>याबाबत फेज वाईज काम सुरु असुन वरच्या भागातील नद्यावरील पुलांवर जाळ्या बसविण्याचे काम पुर्ण झाले असुन खालील भागातील पुलांवर जाळ्या लावण्याचे कामकाज करण्यात येत असल्याचे श्री. गुंडे यांनी सांगितले.<br>पुलावरुन निर्माल्य नदीत फेकता येऊ नये यासाठी सर्व नद्यांवरील जाळ्या बसविण्याची कार्यवाही लवकर पुर्ण करावी. | गोदावरी संवर्धन कक्ष विभाग मनपा | नदीच्या पुलांवर जाळ्या बसविणेबाबत सा.बा.विभाग. मनपा मार्फत निविदा प्रक्रिया कार्यान्वीत आहे. |